# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

क्र.मह./आस्था/टे-३/कोतवाल/प्रा.ज्ये.यादी/एसआर-०१/२०२१
दिनांक - १४.०१.२०२१

**वाचले :-**

१) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम १९८२
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११
३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, परिपत्रक क्रमांक स ३०/४२००/प्र.क्र.६३५/ई१०, दि.१९/०७/२००१
४) तहसिलदार मोखाडा यांचेकडील पत्र क्र.महसूल/टे-४/आस्था/कावि-/२०२०, दि.०५.११.२०२०
५) तहसिलदार विक्रमगड यांचेकडील पत्र क्र.कात-११/टे-१/आस्था/को.प्रा.ज्ये./कावि-२५३/२०, दि.२५.०८.२०२०
६) तहसिदार वाडा यांचेकडील पत्र क्र.महसूल/आस्था/कावि-२१/२०, दि.१७.०१.२०२०
७) तहसिलदार पालघर यांचेकडील पत्र क्र.मह/आस्था-२/कोतवाल/ज्येष्ठता यादी/कावि-२०२०, दि.२४.०१.२०२०
८) तहसिलदार डहाणू यांचेकडील पत्र क्र.महसूल/आस्थापना/कावि-३४०/२०, दि.१८/०२/२०२०
९) तहसिलदार तलासरी यांचेकडील पत्र क्र.महसूल/आस्थापना/कावि-५८८/२०२०,दि.१९.१०.२०२०
१०) तहसिलदार जव्हार यांचेकडील पत्र क्र.महसूल/टे-२/आस्था/कावि-०२/२०२१, दि.०१.०१.२०२१
११) तहसिलदार वसई यांचेकडील पत्र क्र.मशा/कक्ष-१/टे-आस्था/कावि-३११/१८, दि.२२.०१.२०२०
१२) या कार्यालयाकडील मंजुर टिपणी दि.१४.०१.२०२१

---

**विषय:-** जिल्हास्तरीय कोतवाल संवर्गाची एकत्रित जिल्हास्तरीय अंतरिम (प्रारुप) ज्येष्ठता यादी दिनांक ०१.०१.२०२०

**ज्ञापन :-**

उपरोक्त क्र.१ ते ३, मधील तरतूदीं तसेच या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तहसिल कार्यालयांचे क्र. ४ ते ११ अहवालांनुसार पालघर जिल्ह्यातील तहसिल कार्यालयांच्या आस्थापनेवरील कोतवाल संवर्गाची दि.०१/०१/२०२० रोजीची जिल्हास्तरीय एकत्रित सेवा ज्येष्ठता दर्शविणारी अंतरिम (तात्पुरती) ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेत येत आहे. सदर यादी प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत त्यावर हरकत/सुचना दाखल करता येतील. सदर हरकती / सुचना कार्यालय प्रमुखांच्या अभिप्रायासह पाठवाव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकती / सुचना विचारात घेतल्या जाणार नाही.

सर्व कार्यालय / शाखा प्रमुख यांनी सदरची अंतरिम (तात्पुरती) ज्येष्ठता यादी त्यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन, त्यांचे अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या सर्व संबंधित कोतवाल कर्मचाऱ्यांच्या निर्देशनास आणुन, ज्येष्ठता यादीवर संबंधित कोतवालांची स्वाक्षरी घेऊन यादीसह अहवाल या कार्यालयात त्वरीत सादर करण्यात यावा.

सही/-
**(डॉ माणिक गुरसळ)**
**जिल्हाधिकारी पालघर**

प्रत : १) अपर जिल्हाधिकारी पालघर, मुख्यालय जव्हार, यांना माहितीसाठी
२) सहा. जिल्हाधिकारी जव्हार, विभाग जव्हार, यांना माहितीसाठी
३) उपविभागीय अधिकारी पालघर/वाडा/वसई/डहाणू यांना माहितीसाठी
४) तहसिलदार (सर्व)
५) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, पालघर
२/- सदर कोतवाल संवर्गाची दि.०१.०१.२०२० रोजीची अंतरिम (तात्पुरती) ज्येष्ठता यादी या कार्यालयाच्या संकेत स्थळावर (www.collectorpalghar.nic.in) प्रसिध्द करावी.

**(स्थळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी सो.**
**यांची स्वाक्षरी असे)**

**(डॉ किरण महाजन)**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय पालघर**